( १ ) पृष्ठ ३२:—संवत् ११९५, शक १०६० माघ शुद्ध ५ सोमवासरे प्रतापबिंबानें कोंकणा वर स्वारी केली.

( २ ) पृष्ठ ३६:—शक १०६९ पर्यंत प्रतापबिंबानें संवत्सर ९ माहिमास राज्य केलें. शक १०६९ त प्रतापबिंब वारला व महीबिंब राज्या वर आला.

( ३ ) पृष्ठ ३७:—संवत् १२४५ त चंपावतीच्या भोजराजाशीं लढाई, शक १११०.

( ४ ) पृष्ठ ३७:—संवत् १२६९, शक ११३४ त महीबिंब ६५ वर्षें राज्य करून वारला. केशवदेव राज्या वर आला.

( ५ ) पृष्ठ ३९:—संवत् १२८१, शक ११४६ भोजाचा पराभव.

( ६ ) पृष्ठ ४१:--संवत् १२९४, शक ११५९ त केशवदेव २५ वर्षें राज्य करून वारला. जनार्दन प्रधान राज्या वर आला.

( ७ ) पृष्ठ ४१:--संवत् १२९८, शक ११६३ पर्यंत जनार्दन प्रधानानें राज्य केलें वर्षें ४ चार. घणदिव्याचा नागरशा संवत् १२९८, शक ११६३ माघशुद्ध ७ भौमे जनार्दन प्रधाना वर स्वारी करून कोंकणीं आला.

( ८ ) पृष्ठ ६१।६२:--संवत् १५०५, शक १३७० फाल्गुन वसंततुं केशवाचार्यानें वंशपद्धति रचिली.

( ९ ) पृष्ठ ७०:--संवत् १४५९ त बहादूरशहानें निवाडा सिंध्यांचें नावें केला.

(१०) पृष्ठ ८८:--संवत् ५७४ फाल्गुनशुद्ध ९ रविवारीं राम राणा झाला.

(११) पृष्ठ ८९:—शक १२१० त अलाउद्दीन पैठणास आला.

(१२) पृष्ठ ८९:—शक १२१६ त बिंबानें कोंकणा वर स्वारी केली. प्रतापपुरास राहिला.

(१३) पृष्ठ ८९:—शक १२२७ त बिंबानें माहिमास राजधानी नेली.

(१४) पृष्ठ ९१:—शक १२१५ त कोंकणांत पाठारे प्रभू आले.

(१५) पृष्ठ ९७:—शक १२२५ पर्यंत वर्षे ९ मास १ दिन १४ बिंबानें राज्य केलें. प्रतापशा राज्या वर आला.

(१६) पृष्ठ ९७:—शक १२२५ पासून शक १२५३ पर्यंत वर्षे २८ मास ३ प्रतापशानें राज्य केलें.

(१७) पृष्ठ ९८:—शक १२५४ त नागरशानें राज्य घेतलें.

(१८) पृष्ठ ९८:—शक १२६९ पावेतों नागरशानें राज्य केलें.

(१९) पृष्ठ १०२:—शक १२७० त तुर्काण झालें.

(२०) पृष्ठ १०२:—मध्यें कुफराणा होऊन, भोंगळ्यांनीं राज्य केलें वर्षे २०.

(२१) पृष्ठ १०२:—मध्यें मलिक अहमद यानें राज्य केलें वर्षे ३५.

(२२) पृष्ठ १०२:—मलिक अहमद शक १३१३ त वारला.

(२३) पृष्ठ १०३:—शक १४२२ त म्हणजे इ. स. १५०० त फिरंगी पोतुर्गालाहून आले.

(२४) पृष्ठ १०३:—शक १४३४ त म्हणजे इ. स. १५१२ त फिरंगी दवण-प्रांतास आले.

(२५) पृष्ठ १०५:—संवत् १५३५ म्हणजे शक १४००, चैत्रशुद्ध १ गुरुवार या दिवशीं वंशावळी ऊर्फ प्रकरण सहावें लिहिलें गेलें.

(२६) पृष्ठ १०६:—संवत् ११९५ त बिंबशा स्वामी कोंकणप्रांतास आले.

(२७) पृष्ठ १०८:—शक १७४१ प्रभाथी वैशाखशुद्ध प्रतिपदा रविवासरे बखरीची नक्कल झाली.